www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118




सर्व वाचकांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !


# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




■ ठाणे प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे वर्षभरात...

पान ३ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २०७ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, ०१ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## ए. आय. चा वापर करून रस्ता सुरक्षा वाढविण्यावर भर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● मुंबई, विशाल कारंडे :

परिवहन क्षेत्राला राज्याला सुरक्षित, सुंदर आणि शाश्वत ठेवण्यासाठी पुढील ३ वर्षात नवीन ई. व्ही. पॉलिसी घोषित करण्याकरण्याबरोबरच १५ वर्ष झालेली वाहने भंगारात काढावी. रस्ते अपघाताचे प्रमाण करण्यासाठी ए.आय.चा ( AI ) वापर करून रस्ते सुरक्षा वाढविण्यावर भर देण्यात यावा. यासंदर्भात गुगलशी करार झाला असल्याने त्याचा वापर करावा. त्याचबरोबर घाटात मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने यावर इंजिनियरिंग सोल्यूशन शोधून काढावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत दिल्या.



राज्यात परिवहन सेवेला अधिक गती देण्यासाठी राज्यात बाईक टॅक्सी, मॅक्सी कॅब सुरू करण्यावर भर देण्यात यावा. त्याचबरोबर जुन्या १३ हजार शासकीय वाहने भंगारात काढली जावी अशा सूचना करून मुख्यमंत्री म्हणाले की, टॅक्सी, ॲटो, शहर बस सेवेचे तिकीट दरासंदर्भात निर्णय घेण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या. वडसा-गडचिरोली तसेच सोलापूर-उस्मानाबाद येथील रेल्वे प्रकल्पाचे काम हाती घेण्याची सूचना केली. राज्य परिवहन सेवेच्या १५ वर्षे झालेल्या बसेस भंगारात टाकून उर्वरित बसेसमध्ये एल.एन.जी. तसेच सी.एन.जी. बसविण्यात यावी जेणेकरून बसेसची कार्यक्षमता वाढेल. बसेसच्या सुरक्षेसाठी एस.ओ.पी. निश्चित करण्याच्याही सूचना यावेळी मुख्यमंत्र्यांनी केल्या. यावेळी बंदरे तसेच विमानतळ प्राधिकरण आदिबाबतची चर्चा करण्यात आली. पान २ वर

## डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकेच्या फेडरल कोर्टानं लैंगिक शोषण प्रकरणी ठरवलं दोषी!

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. अमेरिकेतील फेडरल कोर्टानं डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधातील लैंगिक शोषण प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने दिलेला ५० लाख डॉलर्स भरपाई प्रकरणातील निकाल रास्त ठरवत तोच कायम केला आहे. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प महिन्याभराने अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतरदेखील त्यांच्याविरोधातील हा खटला न्यायालयात चालूच राहणार आहे. पान २ वर


### डोनाल्ड ट्रम्प यांना ५० लाख डॉलर्सचा दंड

डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात कॅरोल यांनी दिलेला जबाब आणि बहुचर्चित ॲक्सेस हॉलिवूड टेपमधील डोनाल्ड ट्रम्प यांचा रेकॉर्डेड आवाज या गोष्टी ट्रम्प यांच्याविरोधात न्यायालयासमोर मांडण्यात आल्या. या प्रकरणी डोनाल्ड ट्रम्प यांना ५० लाख डॉलर्सचा दंड ठोठावण्यात आला आहे. त्यात २० लाख डॉलर्स हे लैंगिक शोषणाचा दंड म्हणून तर ३० लाख डॉलर्स हे २०२२ साली डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅरोल यांचे आरोप फेटाळताना केलेल्या सोशल मिडिया पोस्टमधून त्यांच्या झालेल्या मानहानीची भरपाई म्हणून देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

## सरकारी रुग्णालयात सफाई कर्मचारीच तपासतोय रुग्ण

### डॉक्टरांच्या उत्तराने भीषण वास्तव समोर

● मुंबई, यश सावंत :



वैद्यकीय क्षेत्रात गेल्या काही वर्षात झालेला बदल आणि कॉर्पोरेट बिझनेसच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरची वैद्यकीय सेवा झाल्याचं पाहायला मिळत आहे. त्यातच, कोविड महामारीत अनेकांनी रुग्णालयातील लुटालुटीच्या प्रकाराचा अनुभव घेतला आहे. एकीकडे खासगी वैद्यकीय सेवा महागडी होत असून दुसरीकडे शासनाच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवेचा अभाव असल्याने सर्वसामान्यांची ससेहेलपाट होताना दिसून येते. अनेकदा सरकारी रुग्णालयात डॉक्टर उपलब्ध नसतात, डॉक्टर असले तर सुविधा नसतात. तर, काही वेळा संबंधित डॉक्टर हे खासगी रुग्णालयांना रेफर करतात. त्यामुळे, वैद्यकीय श्रेत्रात नेमकं चाललंय काय, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो. त्यातच, आता मुंबईतील एका सरकारी रुग्णालयात चक्क सफाई कर्मचारीच रुग्णांची तपासणी करत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

मुंबई महापालिकेच्या चेंबूरमधील पंडित मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालयातील एक गंभीर प्रकार समोर आला आहे. उपचारासाठी आलेल्या रुग्णाची तपासणी सफाई कर्मचारी करत आहे. हा सफाई कर्मचारी रुग्णांचे ECG करत आहेत. समाजवादी पार्टीच्या मुंबई अध्यक्ष आणि माजी नगरसेविका रुकसाना सिद्दी यांनी हा प्रकार समोर आणला आहे. शताब्दी रुग्णालयात रोज हजारोच्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येत असतात, परंतु या ठिकाणी रुग्णांना तपासण्यासाठी डॉक्टरांची आणि कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कर्मचारी भरती न झाल्याने रुग्णांना हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. त्यातच, येथे उपचारासाठी आलेल्या रुग्णांची तपासणी सफाई कर्मचारी करत असल्याचे समोर आल्याने चांगलाच गोंधळ उडाला असून रुग्णालयातील भीषण वस्तुस्थितीच समोर आली आहे. रुकसाना सिद्दिकी यांनी रुग्णालयाचे अधिकारी सुनील पखाले यांना याबाबत जाब विचारलं पण डॉक्टर कर्मचारी यांची कमतरता आहे आणि ह्या सफाई कर्मचाऱ्यांना याचं प्रशिक्षण दिलं आहे, असे उत्तर अधिकाऱ्यांनी दिल्याने नेमकं काय चाललयं, असा गंभीर प्रश्न पडला आहे. विशेष म्हणजे सफाई कर्मचारीच गेले काही दिवस हे काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे, याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी रुक्साना सिद्दिकी यांनी केली आहे. तसेत, यासंदर्भात पोलिसात तक्रार दिली असल्याचेही त्यांनी माध्यमांशी बोलतना सांगितले.

## वाल्मिक कराड अखेर पोलिसांसमोर शरण



● बीड, सचिन कदम :

बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेनंतर सध्या राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या घटनेचा सर्वच स्तरावरुन निषेध केला जात आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड असल्याचे बोलले जात आहे. वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा आहे, असा आरोप संतोष देशमुख यांचे कुटुंबीय आणि गावकऱ्यांकडून केला जात आहे. त्यातच आता एक मोठी अपडेट समोर आली आहे.

### वाल्मिकवर हत्येचा गुन्हा दाखल करावा

■ वाल्मिक कराड हा संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाइंड असल्याचं सांगितलं जात आहे. या प्रकरणात वाल्मिक कराडविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा. त्याला हत्याकांडातील आरोपी करण्यात यावं, अशी मागणी विरोधकांनी केली आहे. त्यामुळे सीआयडी वाल्मिक कराडवर हत्येचा गुन्हा दाखल करणार का? असा सवाल करण्यात येत आहे.

### वाल्मिकचा व्हिडीओ व्हायरल

■ दरम्यान, शरणागती पत्करण्यापूर्वी वाल्मिकीने एक व्हिडीओ शेअर करून आपला संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंध नसल्याचा दावा केला आहे. मला अटकपूर्वचा अधिकार असताना मी सीआयडीसमोर हजर होत आहे. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करावी, फाशी द्यावी. राजकीय कारणासाठी माझं नाव घेऊ नये. या प्रकरणात मी जर दोषी असेल तर मला शिक्षा द्यावी, असं वाल्मिक कराडने म्हटलं आहे.

बीडच्या खंडणी प्रकरणातील सीआयडीला शरण आला आरोपी वाल्मिक कराड अखेर आहे. पान २ वर

## नवीन वर्षात महावितरणची ग्राहकांना भेट

■ गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडा व वीजबिलात एकरकमी १२० रुपये सूट मिळवा




● मुंबई, राकेश गायकवाड :

मुंबई - नूतन वर्षाची भेट म्हणून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तत्काळ वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्याची घोषणा महावितरणने केली आहे.

महावितरणकडून 'कागद वाचवा, पर्यावरण वाचवा' या संकल्पनेनुसार गो-ग्रीन सेवा राबविण्यात येत आहे. त्यानुसार यापूर्वी या योजनेअंतर्गत ग्राहकांना मासिक वीज बिलात १० रुपये सूट देण्यात येते. मात्र आता यापुढे पहिल्याच बिलात पुढील बारा महिन्यासाठी तत्काळ १२० रूपये एकरकमी सवलत मिळणार आहे. पान २ वर



## अखेर भाईंदर मधील बस आगार विकसित करण्यास मंजूरी;

### १३६ कोटीचा खर्च अपेक्षित

● भाईंदर, सुचिता सोनावणे:

भाईंदर पश्चिम येथील रेल्वे स्थानकाला लागून असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या जागेला विकसित करून त्या ठिकाणी बस आगार, उप- प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि मासळी बाजार उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पान २ वर

## पणन मंत्री जयकुमार रावल यांनी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या सुविधांना दिली भेट

● ठाणे, रोहित जैसवाल :

राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष श्री.जयकुमार रावल यांनी काल, दि.30 डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील सुविधांना भेट दिली. या भेटीवेळी पणन व राजशिष्टाचार मंत्री श्री.रावल यांनी सुविधेवर सुरू असलेले कामकाज याबाबतीत अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली. यावेळी कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक श्री. विनायक कोकरे व सुविधेवर काम करीत असलेले अधिकारी



उपस्थित होते.

कृषी पणन मंडळाच्या अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपियन देश, जपान, न्यूझीलंड, मलेशिया, दक्षिण कोरिया इ. देशांना कृषीमाल निर्यात करण्याकरिता आवश्यक असलेल्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्र, उष्ण बाष्प प्रक्रिया केंद्र व भाजीपाला प्रक्रिया केंद्र याबाबतीतील संपूर्ण माहिती सादर करण्यात आली. मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ श्री.रावल यांनी याबाबतीत सुरू असलेल्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.

या कामकाजाच्या चर्चेवेळी मंत्री श्री.रावल यांनी विकसित देशांची निर्यात कशा पद्धतीने वाढविता येईल याबाबत देखील चर्चा केली. भारत सध्या जगातील पाचवी अर्थव्यवस्था म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे आपल्याला आपल्यापेक्षा विकसित अमेरिका व चीन या देशांमध्ये कृषीमालाचे मार्केटिंग कशा पद्धतीने केल्या जाते, याबाबतची माहिती प्राप्त करून घेण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचित केले. पान २ वर

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० च्या प्रकल्पास गती द्यावी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● मुंबई, विशाल पाटील :

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी हा राज्य शासनाचा 'फ्लॅगशीप' कार्यक्रम आहे. या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून विकासकांना काम करताना येत असणाऱ्या अडचणींचा जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी नियमित आढावा घेऊन येणाऱ्या समस्या सोडवाव्यात. यासंदर्भातील अहवाल पुढील १५ दिवसांमध्ये मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प राबवितांना प्रकल्प विकासकांना आता ग्रामपंचायतीकडून 'ना हरकत' प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, जमीन अतिक्रमीत झालेल्या ठिकाणी प्रकल्प विकासक तसेच जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित बैठक घ्यावी. अतिक्रमित जमिनीसंदर्भातील विकासकांना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी पोलीस अधीक्षक यांना जबाबदारी देण्यात यावी.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाकरिता प्रकल्प विकासकांना लागणाऱ्या आवश्यक सर्व परवानग्या ऑनलाईन देण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, हा प्रकल्प राबवितांना काही अडचणी येत असतील आणि त्या जिल्हापातळी, गावपातळीवर सोडविणे शक्य नसेल तर त्या मंत्रालय स्तरावर सोडविल्या जातील. कोणत्याही परिस्थितीत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प वेळेत पूर्ण होऊन कार्यान्वित होईल, याकडे सर्वांनी जबाबदारीपूर्वक पाहण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिल्या. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० ची आढावा बैठक झाली. पान २ वर

## मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्ग प्राधान्याने पूर्ण करणार

### सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यात रस्त्यांचे जाळे विकसित करून ग्रामीण भागांना शहरांशी जोडण्यात येणार आहे. याद्वारे नागरिकांना विविध सोयी - सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामास प्राधान्य देणार असल्याचेही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांनी सांगितले. सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. भोसले यांनी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभागाचा पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.मंत्री श्री. भोसले म्हणाले की, राज्याची सर्वांगीण प्रगती ही पायाभूत सुविधांवर अवलंबून असते. राज्यात दर्जेदार रस्त्यांचे जाळे विकसित करण्याचा शासनाचा मानस आहे. मुंबई-गोवा



राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा आढावा घेण्यात येणार असून, चुकीच्या पद्धतीने काम होत असेल किंवा जमीन हस्तांतरणात अडचणी येत असतील तर त्या समस्यांचे निराकरण करण्यात येईल. मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्ग पूर्ण होणे राज्याच्या आणि जनतेच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने या महामार्गाच्या कामास प्राधान्य देणार असल्याचा पुनरुच्चार मंत्री श्री. भोसले यांनी केला.

() थोडक्यात ()

## ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून ११ शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू

**ठाणे** - जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत ११ शिक्षकांच्या भरतीची प्रक्रिया नोव्हेंबर, २००५ पूर्वी सुरू झाल्यामुळे ११ शिक्षकांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे.

ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या मात्र नोव्हेंबर २००५ पूर्वी भरती प्रक्रिया सुरू झालेल्या शिक्षकांना यापूर्वी परिभाषित अंशदान योजना लागू करण्यात आली होती. मा. उच्च न्यायालयाने एका याचिकेत या शिक्षकांच्या सेवेबाबत पडताळणी करून जुनी निवृत्ती वेतन योजना लागू होते किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने संबंधित शिक्षकांची सुनावणी घेऊन कागदपत्रे पडताळणी अंती या ११ शिक्षकांच्या भरतीची प्रक्रिया नोव्हेंबर, २००५ पूर्वी सुरू झाल्यामुळे ११ शिक्षकांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा महत्त्वपुर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत विशेष पाठपुरावा प्रत्येक सोमवारी आढावा बैठक घेऊन शिक्षकांचा बराच काळ प्रलंबित असलेले विविधS प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न जिल्हा परिषदे मार्फत करण्यात येत आहेत. कामकाजाचा वेळोवेळी पाठपुरावा होत असल्याने ११ शिक्षकांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे. याबाबत संबंधित शिक्षक व शिक्षक संघटना यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी (प्राथ) बाळासाहेब राक्षे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ ४२६ शिक्षकांना मंजूर

**ठाणे** - राज्यात २०१४ मध्ये सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला असून जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विभागातील ४२६ शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा परिषदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाने शिक्षकांना मिळणाऱ्या विविध लाभ याबाबत विशेष पाठपुरावा करण्यात येत आहे.

शिक्षण प्राथमिक विभागातील मुख्याध्यापक १६, पदवीधर शिक्षक ४८ व प्राथमिक शिक्षक ३६२ अशा एकूण ४२६ शिक्षकांना एका पदावर १२ वर्ष सेवा पूर्ण झाल्याने वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या विविध लाभ याबाबत विशेष पाठपुरावा वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी घेत असल्याने शिक्षण विभागातील ४२६ शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. याबाबत संबंधित शिक्षक व शिक्षक संघटना यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी (प्राथ) बाळासाहेब राक्षे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# ५२ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनास विद्यार्थी व पालकांनी सहभागी व्हावे - मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

**ठाणे (सम्यक कासारे)** - विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुढ व्हावा व सामाजिक पर्यावरणास अनुकूल आणि सध्याच्या काळाची गरज लक्षात घेऊन जिल्हा परिषदेत माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने ५२ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि. ०२ जानेवारी, २०25 ते ०३ जानेवारी, २०२५या कालावधीत न्यू इंग्लिश स्कूल, कळवा येथे आयोजित करण्यात आला आहे. विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य विषय शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान असून या विषयानुरूप विद्यार्थ्यां मार्फत ११० प्रदर्शनीय साहित्याची मांडणी केली जाणार आहे.

महानगरपालिका व तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शनामध्ये शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाला पूरक असे विशेष प्राविण्य प्राप्त व समाजासाठी उपयुक्त असे प्रकल्प जिल्हा स्तरावरील प्रदर्शनामध्ये मांडणी केले जाणार आहे तरी जास्तीत जास्त विद्यार्थी व पालक यांनी या विज्ञान प्रदर्शनास भेट देऊन नवीन संकल्पना



व प्रतिकृतींची माहिती घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

या प्रदर्शनात इयत्ता ०६ वी ते १२ वी वर्गातील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. माध्यमिक, प्राथमिक, आदिवासी, दिव्यांग, शिक्षक, प्रयोगशाळा परिचर या विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. जिल्हास्तरासाठी निवड झालेल्या सर्व शाळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहितुले यांनी केले आहे.

अन्न, आरोग्य आणि स्वच्छता (A Food, Health and Hygiene), वाहतुक आणि दळणवळन (Transport And Communication), नैसर्गिक शेती (Natural Farming), आपत्ती व्यवस्थापन (Disaster Management), गणितीय मॉडेलिंग आणि संगणकीय विचार (Mathematical Modeling and Computational Thinking), कचरा व्यवस्थापन (Waste Management), संसाधन व्यवस्थापन (Resource Management) या विषयावरील प्रदर्शनामध्ये ११० प्रदर्शनीय साहित्याची मांडणी केले जाणार आहे.

# पतंग उडवण्यासाठी चिनी मांजा, चिनी दोरा वापरण्यास ठाणे महापालिका क्षेत्रात प्रतिबंध

- ठाण्यात २५५ आस्थापनांची केली तपासणी
- एकल वापराचे सुमारे २१४ किलो प्लास्टिक जप्त, ८९ हजार रुपयांचा केला दंड
- चिनी मांजांची विक्री होत असल्यास ८६५७८८७१०१ या टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन
- दक्षता पथकांमार्फत आस्थापनांची तपासणी सुरू

**ठाणे (रोहित जैसवाल)** : पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा प्लास्टिक किंवा सिंथेटिक पदार्थापासून तयार केलेला चिनी मांजा, चिनी दोरा किंवा नायलॉन किंवा प्लास्टिक कृत्रिम मांजा हा माणसांसाठी तसेच पक्ष्यांना घातक ठरतो. त्यामुळे या मांजांच्या वापरावर ठाणे महापालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यात आला आहे.

महापालिका क्षेत्रात त्याअनुषंगाने करण्यात आलेल्या तपासणी मोहिमेत सर्व प्रभाग समिती क्षेत्रात एकूण २५५ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यांच्याकडे चिनी मांजा आढळला नाही. मात्र, या तपासणीत एकल वापराचे सुमारे २१४ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. तसेच, ८९ हजार रुपयांचा दंड करण्यात आला.पतंग उडवण्यासाठी तीक्ष्ण धातू किंवा काच घटक किंवा चिकट पदार्थ तसेच धागा मजबूत करणारा पदार्थ नसलेला केवळ सुती धागा वापरण्यास परवानगी आहे. चिनी मांजा म्हणून ओळखला जाणारा हा धागा तयार करण्यासाठी बारिक चूरा केलेली काच, धातू किंवा अन्य तिक्ष्ण पदार्थांचा वापर करण्यात येतो. अशा धाग्याचे उत्पादन, विक्री, साठवण आणि वापर यावर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने निर्बंध घातलेले आहेत. या धाग्याचे जैविकरित्या विघटन होत नसल्याने मल प्रणाली, जलनि:सारण बाधित होते. तसेच असे पदार्थ खाल्ल्याने जनावरांनाही इजा होते.

तसेच, हा धागा विद्युत वाहक असल्याने वीज साहित्य आणि वीज उपकेंद्र यांच्यावरही भार येऊन वीज पुरवठा खंडित होण्याची शक्यता असते.या तपासणी दरम्यान, एकल वापराचे सुमारे २१४ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. तसेच, ८९ हजार रुपयांचा दंड करण्यात आल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यानी दिली.

### दक्षता पथकांमार्फत तपासणी सुरू

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, चिनी मांजा तथा सिंथेटिक-नायलॉन मांजाची विक्री, उत्पादन, साठवण आणि वापर टाळण्यासाठी प्रभाग समिती स्तरावर तपासणी आणि जप्ती मोहीम नियमितपणे राबविण्यात येत आहे. त्यासाठी, प्रत्येक प्रभाग समितीत सहाय्यक आयुक्त स्तरावर कर निरिक्षक, स्वच्छता निरिक्षक, आरोग्य निरिक्षक, प्रदूषण नियंत्रण कर्मचारी यांचे दक्षता पथक तयार करण्यात आले आहे. तसेच, स्थानिक पोलिसांनाही याविषयी माहिती देण्यात आली आहे. आतापर्यंत या तपासणी मोहिमेत सर्व प्रभाग समिती क्षेत्रात एकूण २५५ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यांच्याकडे चिनी मांजा आढळला नाही.

## टी.एस. चाणक्य तलावात फ्लेमिंगोंचे आगमन



**नवी मुंबई (धनश्री सट्टा)** : नवी मुंबईला फ्लेमिंगो सिटी संबोधले जात असून डीपीएस, एनआरआय, टी एस चाणक्य तलावात दरवर्षी मोठ्या प्रमाणात फ्लेमिंगोंचे आगमन होत असते. यंदा टी.एस चाणक्य तलावात फ्लेमिंगोचे आगमन झाले आहे. मात्र एनआरआय, डीपीएस तलावांना अद्याप फ्लेमिंगोंची प्रतीक्षा आहे.

नवी मुंबई शहरात फ्लेमिंगो पाहण्यासाठी मुंबई, नवी मुंबई, पनवेल, उरण, ठाणे अशा विविध भागांतून नागरीकांची गर्दी पाहायला मिळते. टी.एस. चाणक्य तलावात फ्लेमिंगोंचे आगमन भरतीच्या वेळेनुसार होत असून १ ते दीड फूट पाण्यात फ्लेमिंगो मनसोक्त खाद्य मिळवतात. नवी मुंबईतील पाणथळ क्षेत्रात फ्लेमिंगोना भरपूर खाद्य मिळत असल्याने त्यांचा वावर अधिक असतो. पुढील चार पाच महिने फ्लेमिंगो शहरात राहणार आहेत. दरम्यान, फ्लेमिंगो पाहण्यासाठी येणारे नागरिक तलाव परिसरात अगदी तलावापर्यंत वाहने घेऊन जातात. हा प्रकार रोखावा व भुयारी मार्गाच्या पुढे वाहने घेऊन जाता येऊ नये यासाठी प्रवेशद्वार करण्याची पर्यावरणप्रेमींची मागणी आहे. काही उत्साही नागरिकांकडून तलावाजवळ वाहने पार्क करण्यावरून परिसरात नेहमी गर्दी, वादावादीचे प्रकार घडतात.

# ठाणे प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे वर्षभरात आल्या ३९७७ तक्रारी

**ठाणे (सम्यक कासारे)** : ठाणे महानगरपालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे २०२४मध्ये एकूण ३९७७ तक्रारींची नोंद झाली. त्यापैकी सर्वाधिक तक्रारी या आग तसेच झाडे यांच्याबद्दलच्या होत्या. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या बचाव आणि मदत कार्यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान टाळण्यात विभागाला यश मिळाले. प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे तक्रार आल्यानंतर आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीचे मदत आणि बचाव कार्य केलेच. शिवाय, अतिरिक्त मदतीची आवश्यकता भासल्यास अग्निशमन दल, वृक्ष प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल तसेच पोलीस यांच्या मदतीने मदत आणि बचाव कार्य करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वाय. एम. तडवी यांनी दिली.



महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार ठाणे महापालिकेचा प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष सदैव मदत आणि बचाव कार्यासाठी तत्पर असतो. अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे आणि उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) जी. जी. गोदेपुरे यांच्या मार्गदर्शनात ठाणे महापालिकेचा सर्व विभागांशी तसेच, इतर यंत्रणांशी समन्वय साधून तत्काळ निर्णय घेतले जातात. त्यामुळे मदत आणि बचाव कार्य जलद आणि प्रभावी करणे शक्य होते, असेही तडवी यांनी सांगितले.

आपत्ती व्यवस्थापन कक्षाने केलेली काही उल्लेखनीय बचाव कार्ये

१. डिसेंबर २०२४ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, येऊर येथे ट्रेकिंगसाठी गेलेले १० तरूण मधमाशा चावल्याने, भीतीमुळे तेथेच अडकले होते. त्यांची सुटका करण्यात आली.

२. डिसेंबर २०२४मध्ये कॉसमॉस रेसिडन्सीमधील दोन वयस्कर व्यक्ती आत्महत्या करणार असल्याची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस यांच्या सहकार्याने जलद कारवाई करून पाच ते १० मिनिटांत त्या दोन्ही व्यक्तींना वाचवण्यात यश मिळाले.

| तक्रारींचे स्वरुप | - संख्या |
|---|---|
| आगी संबंधित | - ८१५ |
| झाड पडणे | - ६७५ |
| झाडाची फांदी पडणे | - ४८४ |
| झाड धोकादायक स्थितीत असणे | - १६८ |
| स्लॅब पडणे | - ०४ |
| पाण्याची गळती | - २१३ |
| पाणी साचणे | - ६५ |
| गॅस गळती | - ३८ |
| घर पडणे | -०३ |
| इमारतीचा भाग पडणे | -०३ |
| इमारत धोकादायक स्थिती असणे | -०२ |
| संरक्षण भिंत पडणे | -२१ |
| नाल्याची भिंत पडणे | - ०६ |
| गच्ची/गॅलरी पडणे | - ०५ |
| जमीन खचणे - दरड कोसळणे | - ०५ |
| लोखंडी शेड पडणे | - १६ |
| बनावट फोन कॉल | - ०२ |
| मॉक ड्रील - रंगीत तालीम | - २९ |
| मृतदेहासंबंधी | - ४२ |
| प्लास्टर पडणे | - १७ |
| रस्त्यावर ऑईल सांडणे | - १९० |
| इतर तक्रारी | - ११७४ |
| एकूण | - ३९७७ |

# वसईत व्याजाने कर्ज देणारी सावकारी टोळी सक्रीय

### ५ जणांविरोधात गुन्हा दाखल

**वसई (सुचिता सोनावणे)** : बेकायदेशीरपणे व्याजाने कर्जे देऊन आर्थिक पिळवणूक करणारी सावकारी टोळी वसईत कार्यरत असल्याचे उघड झाले आहे. माणिकपूर पोलिसांनी याप्रकरणी एका महिलेसह ५ जणांविरोधात सावकारी कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल केले आहे. ही टोळी प्रामुख्याने रिक्षाचालकांना कर्जे देऊन त्यांचे आर्थिक शोषण करत होती.

वसई विरार मध्ये परराज्यातून मोठ्या संख्येने नागरिक स्थलांतरीत होऊन रहायला येतात. उपजिविकेसाठी ते रिक्षा चालवत असतात. त्यांना पैशांची गरज असते. अशा लोकांना बेकायदेशीरपणे व्याजाने कर्जे देऊन नंतर त्यांची आर्थिक शोषण करणारी एक टोळी वसईत कार्यरत होती. यातील एका प्रकरणात माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार झाल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.

निलेश राठोड या रिक्षाचालकाने रेखा कनोजिया या महिलेकडून १ लाखांचे कर्ज घेतले होते. त्या बदल्यात मुद्दल संपेपर्यंत महिन्याला १० हजार आणि तीन कोरे धनादेश या सावकार महिलने घेतले होते. सुरवातीचे दोन महिने राठोड याने २० हजार रुपये कसेबसे फेडले. मात्र त्याला शक्य झाले नाही. त्यानंतर राठोडच्या आईने



पदरमोड करून ८० हजार रुपये दिले. परंतु ही व्याजाची रक्कम असून मुद्दम बाकी आहे असे त्याला सांगण्यात आले. मुद्दलाचे ९० हजार रुपये दोन दिवसात भरण्याची धमकी देऊन त्याची रिक्षा जप्त करण्यात आली.

याशिवाय कोऱ्या धनादेशावर ६ लाख रुपये टाकून वसूल करण्याची धमकी दिली. आधीच कर्ज, त्यावर वाढते व्याज आणि हातातील रिक्षा देखील गेल्याने राठोड हवालदील झाला होता. अखेर त्याने माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. माणिकपूर पोलिसांनी रेखा कनोजिया व तिची मुलं दर्पण कनोजिया ,रोहित उर्फ चंदन कनोजिया, सागर कनोजिया यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम२०२३ कलम३५१(२),३५२, सह महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ कलम ३९,४५,४६. नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यानंतर पोलिसांनी सावकारांनी जप्त केलेली रिक्षा तक्रारदारास परत मिळवून दिली.


# डोंबिवली, कल्याणमध्ये वृक्ष प्रदूषित रोषणाई; पालिकेच्या उद्यान विभागाकडून कारवाईचा इशारा

**कल्याण (विवेक गुंजाळ)** – नववर्षानिमित्त अनेक दुकानदार, खासगी आस्थापनांनी आपल्या दुकान, आस्थापनांसमोरील झाडांवर विद्युत रोषणाई केली आहे. झाडांवर विद्युत रोषणाई करू नये, असे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. तरीही काही व्यावसायिक त्या आदेशाचे उल्लंघन करत आहेत. अशा व्यावसायिकांवर कारवाई करण्याचा इशारा कल्याण डोंबिवली पालिकेचे उपायुक्त आणि उद्यान विभागाचे मुख्य अधीक्षक संजय जाधव यांनी दिला आहे.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी कल्याण, डोंबिवली शहरातील अनेक दुकानदारांनी आपली दुकाने सजवली आहेत. ही दुकाने सजविताना दुकान समोरील झाडांवर, झाडाच्या खोडावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. अशाप्रकारे झाडांवर विद्युत रोषणाई केल्याने झाडांवरील जैवविविधतेला धोका पोहचतो. या झाडांवर अधिवास करणाऱ्या पक्षी, इतर जीवांच्या निवाऱ्यावर त्याचा परिणाम होतो. मुंबई उच्च न्यायालयाने अशाच एका प्रकरणाशी निगडित एका जनहित याचिकेवर निर्णय देताना झाडांना विद्युत रोषणाई करण्यास प्रतिबंध केला आहे.

न्यायालयाच्या निर्णयावरून कल्याण डोंबिवली पालिकेने गेल्या आठ महिन्याच्या काळात एक हजारहून अधिक दुकानांसमोरील झाडांना केलेली विद्युत





रोषणाई काढून टाकली आहे. ज्या दुकानदार, आस्थापनांना न्यायालयाच्या निर्णयाची माहिती नाही ते अनभिज्ञपणे झाडांना रोषणाई करत आहेत. याविषयी पालिकेकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर उद्यान विभागाकडून संबंधित व्यावसायिकाला ती रोषणाई काढून टाकण्याची तंबी दिली जाते.

नववर्षाचे स्वागत करण्यासाठी कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील अनेक हॉटेल्स, ढाबा मालक, मद्यविक्री दुकाने, कपडे विक्री दुकाने, केशकर्तनालय, शोभेच्या वस्तू विक्री करणाऱ्यांनी दुकानसमोरील झाडांवर विद्युत रोषणाई केली आहे. याविषयी पर्यावरणप्रेमींनी काही व्यावसायिकांना ही कृती करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सूचनेला कोणीही दाद दिली नाही. व्यावसायिकांनी दुकानाला विद्युत रोषणाई केली की ती वर्षभर झाडावरून काढली जात नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत.

नववर्षानिमित्त पालिका हद्दीत अनेक व्यावसायिकांनी झाडांना विद्युत रोषणाई करून वृक्ष प्रदूषित केले आहेत. अशा व्यावसायिकांवर कारवाई करण्यासाठी पालिकेच्या उद्यान विभागाने मोहीम हाती घेण्याची मागणी पर्यावरणप्रेमी, जागरूक नागरिकांकडून केली जात आहे.

झाडांवर विद्युत रोषणाई करू नये यासाठी उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश आहेत. ज्या व्यावसायिकांना या आदेशाची माहिती आहे ते अशाप्रकारची विद्युत रोषणाई करण्यास पुढाकार घेत नाहीत.

# आई तशी लेक! आलिया भट्ट अन् राहा कपूरच्या 'त्या' कृतीने वेधलं लक्ष, पापाराझींसमोर दिली सेम टू सेम प्रतिक्रिया



राहा कपूर सध्या सोशल मीडियाची फेव्हरेट स्टारकिड झालेली आहे. नाताळचा सण आणि राहा यांचं एक वेगळं कनेक्शन निर्माण झालेलं आहे. दरवर्षी कपूर कुटुंबीय एकत्र येऊन ख्रिसमस साजरा करतात. यावर्षी सुद्धा या कुटुंबीयांनी एकत्र सेलिब्रेशन केलं. पण, या सगळ्यात चर्चेत होती ती म्हणजे रणबीर आलियाची लाडकी लेक राहा कपूर. ही चिमुकली अवघ्या दोन वर्षांची आहे पण, तिचा गोंडस अंदाज, क्यूट हावभावांमुळे सगळेजण राहा कॅमेऱ्यासमोर केव्हा येणार याची आतुरतेने वाट पाहत असतात.२०२३ मध्ये राहा पहिल्यांदा माध्यमांसमोर आली होती. तेव्हा ती अगदीच एक वर्षांची असल्याने बाबा रणबीरला बिलगून होती. पण, यावर्षी ( २०२४ ) राहाने सगळ्या पापाराझींना ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या. आलिया सुरुवातीला पापाराझींसमोर आली आणि तिने, "राहा बाहेर येतेय... प्लीज आवाज करु नकात शांत बसा" असं हातवारे करून सर्वांना सांगितलं होतं. यानंतर बाबाच्या कडेवरून राहा गाडीच्या बाहेर आली आणि तिने सर्वांना ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या.

राहाने जाता-जाता कॅमेऱ्याकडे पाहून सर्वांना हाय केलं. इतकंच नव्हे तर फ्लायिंग किस सुद्धा दिल्या. पण, शेवटी या चिमुकलीने आपल्या आईसारखी हुबेहूब एक कृती केली. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आलिया ज्याप्रकारे हातवारे करून शांत बसा, मोठ्याने बोलू नका असं पापाराझींना सांगत होती, अगदी त्याचप्रकारे राहाने सुद्धा सर्वांना तोंडावर हात ठेवून शांत बसा असा इशारा केला. या मायलेकींच्या सेम टू सेम कृतीचं सध्या सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

ख्रिसमसनंतर आता कपूर कुटुंबीय नवीन वर्षाचं स्वागत करण्यासाठी सुट्ट्यांवर गेले आहेत. यावेळी राहा एअरपोर्टवर आपल्या आई-बाबांसह पुन्हा एकदा पापाराझींना अभिवादन करताना दिसली. तिने सर्वांना फ्लायिंग किस दिल्या. हा गुण सुद्धा रणबीर आणि आलियाकडून राहाने अगदी सेम टू सेम घेतलाय अशा आशयाचे व्हिडीओ सुद्धा चाहत्यांकडून बनवण्यात आले आहेत. दरम्यान, राहा कपूरबद्दल सांगायचं झालं, तिचा जन्म ६ नोव्हेंबर २०२२ रोजी झाला. यावर्षी नोव्हेंबर महिन्यात जिओ सेंटरला राहाचा दुसरा वाढदिवस थाटामाटात साजरा करण्यात आला होता.

## 'बिग बॉस मराठी' फेम जान्हवी किल्लेकर लवकरच नव्या दमदार भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येणार

'बिग बॉस मराठी'चं पाचव्या पर्व गाजवणारी 'किल्लर गर्ल', 'टास्क क्वीन' अर्थात जान्हवी किल्लेकर सध्या खूप चर्चेत असते. 'बिग बॉस मराठी' संपल्यापासून जान्हवी ठिकठिकाणी आयोजित केलेल्या कार्यक्रमात, तसंच नव्या चित्रपटाच्या प्रिमियर सोहळ्यात दिसते. अलीकडेच जान्हवी घन:श्याम दरवडेच्या वाढदिवसानिमित्ताने आपल्या कुटुंबासह त्याच्या गावी शुभेच्छा देण्यासाठी गेली होती. याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाले होते. त्यानंतर आता जान्हवी किल्लेकरच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे.

अभिनेत्री जान्हवी किल्लेकर लवकरच्या नव्या दमदार भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. महाराष्ट्राची नंबर वन वाहिनी 'स्टार प्रवाह'वरील लोकप्रिय मालिकेत जान्हवी झळकणार आहे. याचा खुलासा 'आता होऊ दे धिंगाणा ३' या कार्यक्रमाच्या नव्या प्रोमोमधून झाला आहे.

'स्टार प्रवाह'च्या इन्स्टाग्राम पेजवर 'आता होऊ दे धिंगाणा ३'चा नवा प्रोमो शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये एक चोर सिद्धार्थ जाधवकडे येतो आणि सांगतो की, मी एक चोर असून मला मॅडमनी खूप मारलं आहे. तेव्हा सिद्धार्थ विचारतो, "तुला कोणी मारलं?" तर चोर म्हणतो, "पोलीस मॅडमने मारलं." त्यानंतर जान्हवीची जबरदस्त एन्ट्री दाखवण्यात आली आहे. यावेळी सिद्धार्थ जाधव म्हणतो की, स्वागत करुया इन्स्पेक्टर दीपशिखा भोसले पाटील अर्थात जान्हवी किल्लेकरचं.

'आता होऊ दे धिंगाणा ३'च्या या भागात 'घरोघरी मातीच्या चुली' आणि 'अबोली' मालिकेची टीम सहभागी झाल्याचं पाहायला मिळत आहे. यावेळी 'अबोली' मालिकेच्या टीमच्या कलाकारांनी फिकट गुलाबी रंगाचे आउटफिट घातले आहेत. तसंच जान्हवीने देखील फिकट गुलाबी रंगाचा आउटफिट घातला आहे. त्यामुळे जान्हवी किल्लेकरची 'अबोली' मालिकेत एन्ट्री होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.



दरम्यान, याआधी जान्हवी किल्लेकर 'कलर्स मराठी' वाहिनीवरील 'भाग्य दिले तू मला' मालिकेत काम केलं होतं. या मालिकेत तिने खलनायिकेची भूमिका साकारली होती, जी चांगलीच गाजली. तसंच जान्हवीने अल्बम साँगमध्ये काम केलं होतं.

## जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात OTT वर काय पाहायचं?

नवीन वर्ष सुरू व्हायला अवघे काही तास बाकी आहेत, त्यानंतर २०२५ ची सुरुवा होईल. या नवीन वर्षातही लोकांना मनोरंजनाची कमतरता अजिबात भासणार नाही. कारण जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातच प्रेक्षकांना एकापेक्षा एक दमदार चित्रपट व वेब सीरिज व डॉक्युमेंटरीज पाहायला मिळणार आहेत. तुम्हीही नवीन वर्षाच्या पहिल्या आठवड्यात ओटीटीवर काय पाहायला मिळणार याचा विचार करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठीच आहे. यामध्ये जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होणाऱ्या कलाकृतींची यादी दिली आहे.

**डोंट डाय**

ख्रिस स्मिथची 'डोंट डाय' ही डॉक्युमेंटरीदेखील नवीन वर्षात प्रदर्शित होणार आहे. यात लोकांना ब्रायन जॉन्सनच्या आयुष्याबद्दल बऱ्याच गोष्टी पाहायला मिळतील. ही डॉक्युमेंटरी १ जानेवारी रोजी नेटफ्लिक्सवर रिलीज होईल.

**मिसिंग यू**

'मिसिंग यू' ही एक हॉलिवूड टीव्ही मालिका आहे, जी नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच १ जानेवारी रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. यामध्ये तुम्हाला सस्पेन्सचा पूर्ण डोस मिळणार आहे.

**एविसी- आई ॲम टिम**

ही एक डॉक्युमेंटरी असून ती ३१ डिसेंबर २०२४ रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. यामध्ये प्रेक्षकांना स्वीडिश DJ Avicii च्या आयुष्याबद्दल माहिती मिळणार आहे. या डॉक्युमेंटरीमध्ये प्रेक्षकांना तिच्या संघर्षाची आणि यशाची कहाणी घरबसल्या पाहता येईल.

**ऑल वी इमॅजिन ॲज लाइट**

प्रतिष्ठेच्या कान २०२४ चित्रपट सोहळ्यात 'ग्रां पी' पुरस्कार जिंकणारा ऑल वी इमॅजिन ॲज लाइट आता प्रेक्षकांना घरबसल्या पाहता येणार आहे. हा चित्रपट ३ जानेवारीपासून डिस्ने+ हॉटस्टारवर प्रसारित होणार आहे. हा चित्रपट मुंबईतील दोन मल्याळी परिचारिकांच्या एकमेकांशी जोडलेल्या आयुष्याची कथा सांगतो. या चित्रपटाचे दिग्दर्शन पायल कपाडियाने केले आहे.

**गुनाह २**

गश्मीर महाजनी, सुरभी ज्योती आणि झैन इबाद खान यांची वेब सीरिज 'गुनाह'चा पहिला सीझन हिट झाला होता. त्यानंतर आता त्याचा दुसरा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ३ जानेवारीपासून हॉटस्टारवर 'गुनाह २' डिस्ने+हॉटस्टारवर पाहता येईल.

## "आमिर खानने बॅकस्टेजला लोकांना पाणी...", सुजाता मेहता शाहरूख खानबद्दल म्हणाल्या, "अगदी सामान्य..."



'प्रतिघात' या १९८७ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटात नाना पाटेकर यांच्याबरोबर प्रमुख भूमिकेत काम करीत सुजाता मेहता यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर सुजाता मेहता 'कंवरलाल', 'यतीम' या १९८८ सालच्या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसल्या. इतरही अनेक चित्रपटांत त्यांनी कामे केली. सुजाता मेहता यांनी वेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या. त्याबरोबरच अनेक अभिनेत्यांसह काम केले. जितेंद्र, सनी देओल, मिथुन चक्रवर्ती, रजनीकांत अशा अनेक दिग्गज अभिनेत्यांबरोबर त्यांनी स्क्रीन शेअर केली. आता एका नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी शाहरुख खान व आमिर खान यांना भेटण्याचा अनुभव कसा होता, यावर वक्तव्य केले आहे. 'हिंद रश'ला दिलेल्या एका मुलाखतीत सुजाता मेहता यांनी म्हटले, "चित्कार या नाटकात मी काम करत होते. त्यावेळी तो बॅकस्टेजला काम करत असे. मी जेव्हा शोमध्ये काम करत होते, त्यावेळी आमिर खानचे ट्रेनिंग चालले होते. आमिर खानने बॅकस्टेजला लोकांना पाणी दिले आहे. त्याने खडतर मेहनत घेत प्रशिक्षण घेतले आणि तो टॉप अभिनेत्यांपैकी एक झाला. इतक्या वर्षांनंतर इतके यश मिळाल्यानंतरही तो कुठून आला आहे, हे तो विसरला नाही. एकदा मी पृथ्वी थिएटरला गेले होते, त्यावेळी तो उठून उभा राहिला. धर्मेंद्रला जितका आदर दिला तितकाच आदर त्याने मलाही दिला. तो खानदानी आहे. बॅकस्टेजला काम करत असताना त्याने माझे 'चित्कार'चे शो अनेकदा पाहिले आहेत.

## प्राजक्ता माळी, स्वप्नील-प्रार्थना अन् 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या कलाकारांची फौज! 'या' दिवशी येणार नवा सिनेमा!

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता प्रसाद खांडेकरने 'एकदा येऊन तर बघा' या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच दिग्दर्शनाची धुरा सांभाळली होती. आता नव्या वर्षात त्याचा आणखी एक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. वर्षाखेरीस याची पहिली झलक प्रसादने नुकतीच इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे.

प्रसाद खांडेकरच्या नव्या चित्रपटात सुद्धा दिग्गज मराठी कलाकारांची फौज असणार आहे. या चित्रपटाचा पहिला लूक नुकताच समोर आलेला आहे. या नव्या सिनेमाचं नाव 'चिकी चिकी बुबूम बूम' असं आहे. चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरवर प्रसाद खांडेकरसह स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहेरे, वनिता खरात, प्राजक्ता माळी असे लोकप्रिय कलाकार झळकले आहेत. त्यामुळे आता आपल्याला खळखळून हसवणाऱ्या विनोदवीरांना प्रेक्षकांना रुपेरी पडद्यावर एकाच फ्रेममध्ये पाहण्याची संधी मिळणार आहे.




**एकाच चित्रपटात झळकणार हास्यजत्रेचे लोकप्रिय कलाकार**

'चिकी चिकी बुबूम बूम' हा चित्रपट येत्या २८ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येईल. प्रसाद खांडेकरांच्या या नव्या चित्रपटात त्याच्यासह स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहेरे, प्राजक्ता माळी, नम्रता संभेराव, वनिता खरात, रोहित माने, ओंकार राऊत, निखिल रत्नपारखी, प्रियदर्शनी इंदलकर, सचिन गोस्वामी, चेतना भट, प्रभाकर मोरे, ऐश्वर्या बदाडे, श्याम राजपूत, निखिल बने, प्रमोद बनसोडे, श्लोक खांडेकर, अभिजीत चव्हाण आणि अपर्णा क्षेमकल्याणी हे कलाकार झळकणार आहेत. 'चिकी चिकी बुबूम बूम' चित्रपटाचा पहिला लूक शेअर करत अभिनेता लिहितो, "तुमच्या ३१ डिसेंबरच्या पार्टीत 'चिकी चिकी बुबूम बूम' चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख सांगतोय. तारीख लक्षात ठेवा. २८ फेब्रुवारी २०२५ पासून तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात 'चिकी चिकी बुबूम बूम' बघा आणि मग हसायचं थांबवणं तुमच्या हातात नाही!" या चित्रपटाची हास्यजत्रेचे चाहते देखील आतुरतेने वाट पाहत आहेत. 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचे निर्माते सुनील नारकर असून सहनिर्माते सेजल दिपक पेंटर आणि प्रसाद महादेव खांडेकर आहेत. चित्रपटाचं लेखन प्रथमेश शिवलकर आणि प्रसाद खांडेकर यांचं आहे. याशिवाय या चित्रपटाला रोहन रोहन यांचं संगीत लाभलं आहे.

## नववर्षासाठी या कलाकारांनी केलेत हे संकल्प

नवीन वर्षात प्रत्येकजण काही ना काही संकल्प करत असतात मग तो एक सर्व साधारण व्यक्ती असो किंवा सेलेब्रिटी असो. तुमच्या आवडत्या कलाकारांनीही काही संकल्प केले आहेत, चला जाणून घेऊया काय आहेत ते संकल्प आणि त्यासाठी त्यांची काय तयारी आहे.'नवरी मिळे हिटलरला' मालिकेतील लीला म्हणजेच वल्लरी विराज म्हणाली – "माझ्या २०२५ च्या टू डू लिस्ट मध्ये सर्वात पहिले आहे कत्थक विषारद परीक्षा जी मला द्यायची आहे. २०२४ मध्ये मला परिक्षा द्यायची होती पण 'नवरी मिळे हिटलरला' मालिका मिळाली आणि त्याच्या शूट मध्ये मला वेळ काढता आला नाही. माझी विशारद पूर्ण करायची तयारी सुरु आहे. त्यासोबत मला वाचनाची सवय



लावून घ्यायची आहे, तब्बेतीची काळजी घ्यायची आहे. या ३ गोष्टी माझ्या २०२५ च्या टू डू लिस्ट मध्ये आहेत.""सावळ्याची जणू सावली' मध्ये सावली साकारत असलेली प्राप्ती रेडकर म्हणाली – "२०२५ मध्ये ज्या टॉप ३ गोष्टी करायच्या आहेत त्या मधली पहिली मला फिट राहायचे आहे. मला प्रॉपर डाएट करायचे आहे कारण त्यात मी झिरो आहे. दुसरी म्हणजे, आळशीपणा न करता मला माझं स्पोर्ट्स चालू ठेवायचे आहे आणि तिसरी ही की आई-बाबांना अभिमान वाटेल असे काम करत राहायचे आहे."'लाखात एक आमचा दादा' मधील तुळजा म्हणजेच दिशा परदेशी म्हणते – " माझं माझ्या कामावर खूप प्रेम आहे त्यामुळे मी नवीन वर्षात कामाशी जोडलेल्या सर्व गोष्टी करणार आहे. जेवढं जास्त आणि उत्कृष्ट काम करता येईल तेवढं करणार आहे. स्वत:वर मेहनत घेणार आहे. मला माझं एक स्थान निर्माण करायचे आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, मी एक ट्रॅव्हलर आहे तर अगदी ४ दिवसांची सुट्टी जरी मिळाली तरीही एखादं देश मी एक्सप्लोर करीन २०२५ मध्ये . ""लक्ष्मी निवास' मधली जान्हवी म्हणजेच दिव्या पुगावकर म्हणाली – " पाहिलं तर मला ड्रायविंग शिकायचे आहे. मी कत्थक क्लासेस सुरु केले होते तर ते ही अर्धवट राहिले आहे, ते पूर्ण करणार आहे. मला डांस मध्ये एक प्रकार तरी शिकायचा आहे मग तो बॉलीवूड असो किंवा सेमी क्लासिकल. तिसरी गोष्ट अशी की मला वाचनाची आवड नाहीये, त्यामुळे सुरु वाचनाची सवय लावून घेण्याचा प्रयत्न करीन.""लक्ष्मी निवास' मधली भावना, अक्षया देवधर ने सांगितले, "२०२५ मध्ये मला माझा व्यवसाय वाढवायचा आहे, दुसरी गोष्ट आता कामात ब्रेक नाही आणि 'लक्ष्मी निवास' मध्ये छान काम करायचे आहे. तिसरी गोष्ट, मला माझं वजन कमी करायचे आहे, ज्यासाठी मी डाएट आणि वर्कआऊट दोनीही सुरु केले आहे.""लक्ष्मी निवास' मधली लक्ष्मी साकारत असलेली हर्षदा खानविलकर म्हणाल्या – "नवीन वर्षाची सुरुवात अगदीच उत्तम झाली आहे मी 'लक्ष्मी निवास' मध्ये लक्ष्मी म्हणून एक वेगळी भूमिका साकारत आहेत तर माझा प्रयत्न आहे की मी मला अधिक छान काम करता आलं पाहिजे आणि ते लोकांना आवडेल याची अपेक्षा आहे. शूटिंग मधून वेळ मिळाला कि ट्रॅव्हल ही करीन. तसं माझं स्वप्न आहे जगभर फिरायचे.




**मेष** – सामाजिक कार्यात सहभागी होण्याबद्दल तुम्हाला आदर मिळेल. कार्यक्षेत्रात नवीन नाती निर्माण होतील. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ** – अधिक परिश्रम करावे लागतील. जोडीदाराकडून सन्मान मिळेल. नवीन योजनांवर लक्ष केंद्रित केल्यास फायदा होऊ शकेल.

**मिथुन** – नोकरी आणि व्यवसायाशी संबंधित प्रश्न सोडवाल. आपल्या परिश्रमाचे कौतुक होईल. आपल्या कामावर लक्ष केंद्रित करा.

**कर्क** – गुंतवणुकीत फायदा होईल. लव्ह लाईफमध्ये क्षुल्लक अडचणींचा सामना करावा लागेल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**सिंह** – कौटुंबिक खर्चावर आपणास योग्यरीत्या नियंत्रण ठेवता येईल. तुमचे सामाजिक वर्तुळही वाढेल. तुमची कार्यशैली सुधारेल.

**कन्या** – मन सर्जनशील कार्यात व्यस्त असेल. रागावर नियंत्रण ठेवल्यास समस्या संपुष्टात येईल. सहकाऱ्यांना मार्गदर्शन कराल.

**तुळ** – आर्थिक फायदा होईल. कोणालाही कर्ज देणे टाळा. सामाजिक क्षेत्रात सामाजिक संवाद वाढवण्यास सक्षम असाल.

**वृश्चिक** – कार्यक्षेत्रात काहीतरी विशेष करण्याच्या गडबडीत थोडा वेळ जाईल. अत्यावश्यक कामांमध्ये कसलीही कसर बाळगू नका.

**धनु** – कौटुंबिक जीवनात आनंद आणि समाधानाची भावना अनुभवाल. प्रतिकूल परिस्थितीत निर्णय घेण्याची क्षमता वाढेल.

**मकर** – अधिकाऱ्यांशी क्षुल्लक मतभेद होऊ शकतात. व्यवसायात आर्थिक फायदा होईल. आपले अडकलेले पैसे परत मिळतील.

**कुंभ** – मित्रांच्या सहकार्याने आव्हानांवर मात कराल. विद्यार्थ्यांना काहीतरी नवीन शिकण्याची संधी मिळेल. घरासाठी खरेदी कराल.


**मीन** – उत्पन्न आणि कार्यक्षेत्रात वाढ झाल्यामुळे मन प्रसन्न होईल. वादापेक्षा संवादावर भर द्या. अपूर्ण कामे पूर्ण होतील.

# विधि खात्यातर्फे पाणीपट्टी वाढीची चाचपणी, लवकरच आयुक्तांना अहवाल सादर

मुंबई (यश सावंत) : करोनाकाळात झालेल्या खर्चासह हाती घेतलेले मोठे प्रकल्प लक्षात घेता भविष्यात राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्याशी संबंधित प्रकल्पांसाठी निधी उभा करण्याचे आव्हान मुंबई महानगरपालिकेसमोर आहे. त्यामुळे पाणीपट्टीत वाढ करण्याचा प्रस्ताव जल अभियंता विभागाने आयुक्तांना सादर केला आहे. आयुक्तांनी हा प्रस्ताव विधि खात्याकडे तपासणीसाठी पाठविला असून विधी खात्याचा अभिप्राय प्राप्त झाल्यानंतरच यासंदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे.

मध्य वैतरणा, उर्ध्व वैतरणा, मोडकसागर, तानसा, भातसा, विहार आणि तुळशी या धरणांमधून मुंबईकरांना दर दिवशी ३,९५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो. या धरणांमधील पाणी मोठ्या मुख्य जलवाहिन्यांमधून पाणी शुद्धीकरण केंद्रामध्ये वाहून आणण्यात येते. तेथे जलशुद्धीकरण होते. त्यानंतर जलवाहिन्यांच्या जाळयातून मुंबईकरांच्या घरी पाणी पोहोचविले जाते.

मुंबईमधील जीर्ण झालेल्या जलवाहिन्यांची दुरुस्ती, जलबोगद्यांची निर्मिती, देखभाल, दुरुस्ती आदी



कामांसाठी पालिकेला मोठा निधी खर्च करावा लागत आहे. मुंबईकरांकडून वसूल करण्यात येणाऱ्या पाणीपट्टीतून काही अंशी हा खर्च भागविण्यात येतो. पालिका सध्या मुंबईकरांना प्रती एक हजार लिटर पाण्यासाठी ६ रुपये ३६ पैसे दराने, तर झोपडपट्टयांना ५ रुपये २८ पैसे दराने पाणीपुरवठा करीत आहे. पाणीपुरवठ्याशी संबंधित खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे पाणीपट्टीत वाढ करून काही अंशी देखभाल, दुरुस्ती खर्च, भविष्यात हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी निधी उभारण्याचा जल अभियंता विभागाचा मानस आहे. सध्या जल विभागाच्या खर्चात १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. काही वर्षांपूर्वी पाणीपट्टीमध्ये ८ टक्क्यांपर्यंत वाढ करण्यास प्रशासनाला अर्थसंकल्पातच मंजुरी देण्यात आली होती. त्याचा आधार घेत पाणीपट्टी दरवाढीबाबतचा प्राथमिक प्रस्ताव पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पाठविण्यात आला आहे.

### खर्चात १५ टक्क्यांनी वाढ

गेली दोन वर्षे मुंबईकरांच्या पाणीपट्टीत वाढ करण्यात आलेली नाही. जल विभागाच्या खर्चात साधारण १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे जल विभागाने पाणीपट्टी वाढीचा निर्णय घेतला आहे. काही वर्षांपूर्वी प्रशासनाने पालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये पाणीपट्टीत ८ टक्क्यांपर्यंत वाढ करण्याची तरतूद करण्यात आली होती. पालिका सभागृह व स्थायी समितीने या तरतुदीला मंजुरी दिली. त्यामुळे प्रशासनाला थेट ८ टक्के दरवाढ करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# कुंभमेळ्यासाठी पुण्यातून विशेष रेल्वे

पुणे (अभिजीत येरल्लू) : उत्तर प्रदेश येथील प्रयागराज येथे होणाऱ्या कुंभमेळयानिमित्त रेल्वे विभागाच्या इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशनकडून (आयआरसीटीसी) 'भारत गौरव' या विशेष रेल्वेचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील भाविकांसाठी १५ जानेवारी रोजी पुणे स्थानकावरून रात्री दहा वाजता ही विशेष रेल्वे उत्तर प्रदेशकडे रवाना होणार आहे. केंद्र शासनाच्या 'देखो अपना देश' या योजनेंतर्गत 'भारत गौरव' ही विशेष रेल्वे सेवा सुरू करण्यात आली असल्याचे 'आयआरसीटीसी' पुणे विभागाचे व्यवस्थापक सुभाष नायर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या वेळी पुणे रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक गुरुराज सोन्ना उपस्थित होते.



नायर म्हणाले, 'आयआरसीटीसीच्या या सेवेद्वारे देशभरातून वर्षभरात आतापर्यंत ८६ रेल्वे गाड्या विविध मार्गांवरून धावल्या आहेत. विशेषत: धार्मिक सोहळयाच्या अनुषंगाने या गाड्यांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे अनेकांना देशातील पर्यटनाबरोबर महत्त्वाच्या धार्मिक स्थळांचे दर्शन घेता आले आहे. नववर्षाच्या सुरुवातीला उत्तर प्रदेश येथील प्रयागराज येथे कुंभमेळा पर्व सुरू होत आहे. त्या निमित्त पुणे, तसेच इतर जिल्ह्यांतील, ग्रामीण भागातील प्रवाशांच्या दृष्टीने विशेष रेल्वे गाडीचे नियोजन करण्यात आले आहे. बुधवारी (१५ जानेवारी) पुणे स्थानकावरून रात्री दहा वाजता ही विशेष रेल्वे उत्तर प्रदेशकडे रवाना होणार आहे. पुणे, वाराणसी, प्रयागराज, अयोध्या आणि पुन्हा पुणे असा मार्ग निश्चित करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रवाशांचा सात रात्र, आठ दिवसांचा प्रवास असून, या गाडीला ७ शयनयान डबे, वातानुकुलित डब्यांमध्ये (३ एसी, १ सेमी एसी), जेवण बनविण्यासाठी विशेष डबा, असे नियोजन आहे.' 'या गाडीमध्ये प्रवाशांना सुरक्षारक्षक, सीसीटीव्ही, जेवण व्यवस्था आदी सुविधांसह प्रवासी वाराणसी, प्रयागराज आणि अयोध्या या ठिकाणी उतरल्यानंतर राहण्यासाठीची विशेष सुविधा पुरविण्यात येणार आहे.

SPORT

# Rohit Sharma, Virat Kohli DROPPED; Mohammed Shami Returns: Predicted Test Squad For India's Tour Of England In 2025

**New Delhi -** India suffered a massive defeat at the hands of Australia in the 4th Test of the five-match series of the Border-Gavaskar Trophy at the Melbourne Cricket Ground (MCG). They have thus taken a 1-2 trail in the series, and have lost the opportunity to qualify for the final of the World Test Championship 2025 directly. India's next big Test series after this Australia tour is another vital foreign tour to England in June 2025.

Rohit Sharma and Virat Kohli have been pretty poor in the Test format in the last few innings, and according to reports, this Australia tour might be the last time we might see them in whites. Hence, we might see the two batting stalwarts being dropped from the team as India would look to build for the future in the longest format. In Rohit's absence KL Rahul will be the designated opener alongside Yashasvi Jaiswal.

In Virat Kohli's absence, Sarfaraz Khan is the ideal name to steer India in the middle order, alongside Shubman Gill, Rishabh Pant, and Nitish Kumar Reddy. Reddy, who scored a monumental century in Melbourne, will also prove a handy customer with his bowling, especially in English conditions. Dhruv Jurel can also come in the lower middle order at no.6. Abhimanyu Easwaran and Devdutt Padikkal will be the other batters in the squad.







Ravindra Jadeja will continue to be India's dependable all-rounder at no.7, while Wasington Sundar will be the other spinner in the lineup. Kuldeep Yadav will also be in the squad as he will provide variety with his left-arm leg-spin. In Rohit Sharma's absence, Jasprit Bumrah will take over the reins as captain. He has already shown glimpses of his leadership skill, when he guided India to a historic win vs Australia at Perth. Mohammed Shami will hopefully recover from his knee issues and be ready for the longest format of the game. Mohammed Siraj can be the third pacer in the team, with Akash Deep and PRasidh Krishna being back-ups in the squad. KL Rahul, Yashasvi Jaiswal, Abhimanyu Easwaran, Shubman Gill, Sarfaraz Khan, Rishabh Pant (wk), Dhruv Jurel (wk), Nitish Kumar Reddy, Ravindra Jadeja, Washington Sundar, Jasprit Bumrah (c), Mohammed Shami, Mohammed Siraj, Akash Deep, Prasidh Krishna, Devdutt Padikkal, Kuldeep Yadav

## Brisbane International: Novak Djokovic Breezes Past Rinky Hijikata To Advance

**New Delhi -** Novak Djokovic defeated Australian wild-card entry Rinky Hijikata 6-3, 6-3 on Tuesday at the Brisbane International to advance to the subsequent round without any fuss.Victory in Brisbane in the final on Sunday would be Djokovic's 100th ATP tournament win before the 10-time Australian Open champion seeks a record 25th Grand Slam title in Melbourne.

"I always expect myself to do well on the court. A win is a win and to start the new season with one is very important," Djokovic said.

"Hijikata deserves a round of applause. He was really, really good and made me work for the win."

Australian Nick Kyrgios was attempting to prove his match fitness after 18 months off the tour due to wrist and knee injuries, and gave a good account of himself despite going down to Frenchman Giovanni Mpetshi Perricard.In a match that lasted 2 hours, 27 minutes at Pat Rafter Arena, 21-year-old Mpetshi Perricard beat the 29-year-old Australian in three tiebreak sets — 7-6 (2), 6-7 (4), 7-6 (3).The hard-serving French player rose to No. 31 from outside the top 200 this year.Mpetshi Perricard served 36 aces to Kyrgios's 15, regularly topping 220 kph (135 mph) with ease and backing himself with huge second serves. There were no service breaks in the match."Surely you understand my frustration," Kyrgios told the chair umpire Christian Rask, who had quietly warned him to watch his language after missing a rare chance to break in the second set.On Monday, Djokovic and Kyrgios, who are good friends now, won their first-round doubles match.Kyrgios said his wrist was extremely sore after the doubles win and he didn't sound optimistic of getting far at the Australian Open beginning Jan. 12.



## Can India reach WTC Final if Sydney Test ends in draw? Check the qualification scenario for Rohit Sharma-led side after MCG Test loss

**New Delhi -** Rohit Sharma-led Indian cricket team's chances to qualify for the World Test Championship Final have taken a massive hit following the 184-run loss in the fourth Border-Gavaskar Test which was being played at the iconic Melbourne Cricket Ground, on December 30 (Monday). Australia are in a position where they don't have to be dependent on anyone to seal a spot in the WTC Final next to South Africa. With seven victories from 11 games and a 66.67% point percentage, South Africa is comfortably atop the WTC rankings. Australia, India, and Sri Lanka are now vying for the final slot. Aussies are currently the frontrunners for that one remaining spot and only need one more win in their next three games to book their ticket to Lords.



On the other hand, India is highly dependent on the result of the Sydney Test and the result of the two matches between Australia and Sri Lanka. Their recent run in red-ball cricket, be it the whitewash against New Zealand or the current performance in the Border-Gavaskar Trophy has brought them down from being the top contender to almost out of the final. For India to remain in the running for the WTC final, they must win in Sydney. If Australia were to get only one draw in Sri Lanka, a victory would move India up to 55.26, which would be sufficient for them to finish second. In that scenario, Sri Lanka would finish with 48.72 (winning 1-0) while Australia would fall to 53.51. India will fall to 51.75 and be eliminated from the WTC final race, though, if they only manage a draw. This is because Sri Lanka would reach 53.85 and Australia would finish at 53.51 even if they lost both Test matches in Sri Lanka after drawing in Sydney.

## Australia's Two-Time World Cup Winner Rejects Team India Coaching Job as Pressure on Gautam Gambhir Grows

**New Delhi -** Gautam Gambhir replaced Rahul Dravid after the latter stepped down from the role in June 2024. However, replacing Dravid has not been easy for Gambhir, who has struggled to turn around the team's fortunes.

Not only did India lose a Test series at home for the first time in over a decade when they were whitewashed 3-0 by New Zealand but also succumbed to a bitter defeat in the Boxing Day Test against Australia in the ongoing Border-Gavaskar Trophy series. As a result, they now trail 1-2 in the series.

This led to varied opinions on social media and a number of Indian cricket fans are questioning whether Gambhir is indeed the right man for the job. Gambhir led India to T20I series victories over Sri Lanka and Bangladesh but his Test record so far has been underwhelming.



In the middle of this conundrum, former Aussie star and two-time World Cup winner Darren Lehman was asked if he would be interested in coaching the Indian team sometime in the future.

But Lehmann ruled himself out of the race to become the next head coach of the India men's cricket team, and the 52-year-old said that he is not looking to coach at the international level anymore.

"It would have been an honour to work with Indian national team but I am done with international cricket. I just want the young guys to get better," Lehmann said.

However, Lehmann also predicted that Indian cricket would remain in good health even when Virat Kohli and Rohit Sharma decide to call time on their careers and singled out Yashasvi Jaiswal to be the flagbearer of the next-gen.

# गोदावरी पाणीवाटपासाठी नवे सूत्र? धरण भरण्याची अट ६५ टक्क्यांवरून ५७ वर आणण्याची शिफारस



● छत्रपती संभाजीनगर, दिगंबर जाधव :

जायकवाडी धरणाची पातळी ५७ टक्क्यांपर्यंत आल्यानंतरच ऊर्ध्व भागात म्हणजे नगर व नाशिक जिल्ह्यांतील धरणांतून मराठवाड्याला पाणी सोडण्यात यावे, अशी सूचना करणारा अहवाल महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (मेरी ) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे दिला आहे. सध्या गोदावरीच्या समन्यायी पाणीवाटपाच्या सूत्रानुसार ही पातळी ६५ टक्के इतकी आहे.

### नव्या अहवालाची गरज

मेंढेगिरी समितीने जायकवाडी धरण जर ६५ टक्के भरले असेल, तर नगर व नाशिक जिल्ह्यांतील कोणत्या धरणात किती पाणी असावे याचे सूत्र ठरवून दिले होते. १५ ऑक्टोबरपर्यंतचा पाणीसाठा लक्षात घेऊन सुरू असणाऱ्या समन्यायी पाणीवाटपाच्या धोरणाला न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. हे सूत्र बदलण्यासाठी न्यायालयाने नव्याने अभ्यास करण्याची सूचना केल्यानंतर 'मेरी' संस्थेच्या संचालकांनी नव्या सुधारणा सुचविल्या आहेत.

त्यामुळे या शिफारशींना मराठवाड्यातून तीव्र विरोध होण्याची शक्यता आहे.

पाण्याच्या समन्यायी वाटपाच्या सूत्रातील बदल करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार समिती नेमण्यात आली होती. समितीने पूर्वीच्या सूत्रात बदल करताना नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग केला आहे. या समितीने दिलेला अहवाल प्राप्त झाला असून त्याची छाननी सुरू असल्याचे जलसंपत्ती नियमन प्राधिकारणातील अधिकाऱ्यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सांगितले. केंद्र सरकारने दुष्काळाचे ठरवून दिलेले निकष, वाढलेल्या लोकसंख्येचा विचार करून पिण्याचे व औद्योगिक वापरासाठी लागणारे पाणी याचा विचार करून मेंढेगिरी समितीने सुचविलेल्या सहा धोरणांमध्ये नव्या सुधारणा सुचविल्या आहेत. त्यामुळे जायकवाडीची धरण पातळी ५७ ते ६० टक्क्यांपर्यंत भरले असल्यास समन्यायी वाटपाचे नवे सूत्र लागू करण्याची शिफारस करण्यात आली आहे. १५ ऑक्टोबर रोजीच्या धरणसाठ्याच्या आधारे समन्यायी पाणीवाटप केले जाते. नव्या शिफारशी राज्य सरकारने मान्य केल्या, तर जायकवाडी धरणास मिळणाऱ्या पाण्यामध्ये घट होऊ शकते. नव्या शिफारशींवर आक्षेप घेण्यासाठी ही कागदपत्रे लवकरच खुली केली जाण्याची शक्यता आहे.

### अहवाल काय सांगतो?

समन्यायी पाणीवाटपाचे सूत्र लागू झाल्यानंतर राष्ट्रीय स्तरावर दुष्काळ ठरविण्याचे नवे निर्देश जारी करण्यात आले होते. त्याचा विचार करून पाणीवाटपाच्या सूत्रात बदल करण्यात आला आहे. दुष्काळ ठरवताना पाण्याच्या उपलब्धतेबरोबर हिरवाईचा निर्देशांकही तपासला जातो. त्याचबरोबर पिण्यासाठी लागणारे पाणी, प्रस्तावित केलेल्या योजनांच्या आधारे वापरात न आलेले पाणी याचा विचार करून पाण्याचा प्रभावी उपयोग व्हावा म्हणून शिफारशी केलेल्या आहेत. नाशिक व नगरमध्ये औद्योगिक पाणीवापर आणि लोकसंख्या वाढल्यामुळे पाणी मागणी वाढली आहे. तुलनेने मराठवाड्यात प्रस्तावित उद्योगातील पाणीवापर कमी असल्याने जायकवाडी धरण ६५ टक्के भरले नाही, तर ऊर्ध्व भागातून पाणी देण्याची अट पुढील काळात बदलली जाऊ शकते. त्याची टक्केवारी सात ते आठ टक्क्यांनी कमी करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

---

## मुंबई महानगरपालिकेने करोनाबाधितांसाठी घेतलेले ईएसआयसीचे रुग्ण कक्ष तब्बल तीन वर्षांनी केले परत

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबई महानगरपालिकेने करोनाबाधातांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (ईएसआयसी) कांदिवलीमधील रुग्णालयातील रुग्ण कक्ष ताब्यात घेतला होता. मात्र करोनाचा प्रादुर्भाव संपुष्टात येऊन तीन वर्षाचा कालावधी लोटला तरी मुंबई महानगरपालिकेने हा रुग्ण कक्ष ईएसआयसी रुग्णालय प्रशासनाच्या ताब्यात दिला नव्हता. त्यामुळे या रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत होती. रुग्णालय प्रशासनाने रुग्ण कक्ष परत मिळविण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याला तीन वर्षांनी यश आले असून, सात दिवसांत हा रुग्ण कक्ष रुग्णालयाच्या ताब्यात देण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे.





मुंबई महानगरपालिकेने करोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी २०२०-२१ दरम्यान ईएसआयसीच्या कांदिवली रुग्णालयातील रुग्ण कक्ष ताब्यात घेतला होता. या रुग्ण कक्षात ६३ खाटा आहेत. या रुग्ण कक्षांमध्ये अनेक रुग्णांवर उपचारही करण्यात आले. मात्र करोना संपुष्टात आल्यानंतर हा रुग्ण कक्ष व त्यातील ६३ खाटा पुन्हा ईएसआयसीच्या ताब्यात देणे अपेक्षित होते. मात्र मुंबई महानगरपालिकेने बंद केलेल्या करोना केंद्रातील साहित्य या रुग्ण कक्षांमध्ये ठेवले. त्यामुळे ईएसआयसी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना या कक्षात दाखल करताना रुग्णालय प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत होती. जागेअभावी अनेक रुग्णांना दाखल करून घेण्यास प्रशासनाला नकार द्यावा लागत होता. त्यामुळे रुग्णांकडून संताप व्यक्त केला जात होता. रुग्ण कक्ष परत मिळावा यासाठी रुग्णालय प्रशासनाने वारंवार मुंबई महानगरपालिकेकडे पाठपुरावा केला. मात्र त्याला फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी नुकतीच कांदिवलीतील ईएसआयसी रुग्णालयाला भेट दिली. यावेळी रुग्णालय प्रशासनाने ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्याची दखल घेत तातडीने कार्यवाही करून हा रुग्ण कक्ष ईएसआयसी रुग्णालयाला हस्तांतरित करण्याच्या सूचना पीयूष गोयल यांनी मुंबई महानगरपालिका प्रशासनाला दिल्या.करोना महामारी संपली असून आपण आपल्या रुग्णालयाच्या नियमित रुग्ण कक्षाचा वापर करू शकता. रुग्ण कक्षामध्ये ठेवण्यात आलेले साहित्य पुढील सात दिवसांत तातडीने हलविण्यात येईल, असे पत्र मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे उप आयुक्त संजय कुऱ्हाडे यांनी केंद्रीय मंत्र्यांची सूचना मिळताच ईएसआयसी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांना पाठवले. त्यामुळे तब्बल तीन वर्षांनंतर कांदिवलीतील ईएसआयसी रुग्णालयाला त्यांचा रुग्ण कक्ष परत मिळणार आहे.

---

## बँकांपेक्षा खासगी सावकारांकडूनच शेतकऱ्यांना कर्ज, तब्बल १७.८१ कोटी...

● अमरावती, सचिन कदम :

जिल्ह्यात बँकांपेक्षा खासगी सावकारांनी शेतकऱ्यांना कर्ज दिले आहे. बेकायदेशीर सावकारीला बंदी घालणारा कायदा होऊनही शेतकरी सावकारांच्या तावडीतून सुटत नसल्याचे सहकार विभागाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

जिल्ह्यातील ६३५ परवानाधारक सावकारांनी ६९ हजार २५१ शेतकऱ्यांना (कर्जदार) १७.८१ कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. आजही अनेक शेतकरी खासगी सावकारांकडून कर्ज घेतात. या कर्जाचा व्याजदर जास्त असतो. पण बँकांमार्फत पीक कर्ज वाटपासाठीचे निकष आणि त्यासाठी होणार विलंब यामुळे शेतकरी गावातील किंवा ओळखीतल्या सावकाराकडून कर्ज घेताना दिसून येतात.

तारण ठेवून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. जिल्ह्यातील ६८ हजार



८८४ शेतकऱ्यांनी १५ कोटी २९ लाख ८३ हजार रुपयांचे तारण (गहाण) कर्ज घेतले आहे, तर ३६७ शेतकऱ्यांनी २ कोटी ५१ लाख १९ हजार रुपयांचे बिगर तारण कर्ज घेतले आहे. संबंधित ६९ हजार शेतकऱ्यांनी हे कर्ज २५ एप्रिलपर्यंत संबंधित सावकारांना परत करायचे आहे. जिल्ह्यातील एकाही शेतकऱ्याला एकाही सावकाराने कृषी कर्ज दिले नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. जिल्ह्यात सर्वाधिक २३७ सावकार अमरावती तालुक्यातील असून १४९ अचलपूरचे आहेत.

---

## नववर्षाच्या तोंडावर IRCTC वेबसाइट पुन्हा डाऊन, प्रवाशांचा संताप

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशनची वेबसाइटवर आज पुन्हा एकदा डाऊन झाल्याचे पाहायला मिळाले. यानंतर नवे वर्ष साजरे करण्यासाठी पर्यटनाला गेलेल्या आणि जाण्याचे नियोजन करत असलेल्या प्रवाशांनी मोठा संताप व्यक्त केला आहे. तत्काळ तिकीट बुकिंग दरम्यान ही समस्या सकाळी १० च्या सुमारास सुरू झाल्याचे अनेक प्रवाशांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सांगितले आहे. गेल्या आठवड्यातही आयआरसीटीसीच्या सर्व्हरमध्ये असाच बिघाड झाला होता. सर्व्हर बंद झाल्यामुळे देशभरातील असंख्य प्रवाशांना तिकीट बुक करण्यात अडचणी आल्याने त्यांनी संताप व्यक्त केला आहे. दरम्यान आयआरसीटीसी वेबसाइट डाऊन होण्याची ही महिन्यातील तिसरी वेळ आहे.गुगल प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअरवरून IRCTC Rail Connect ॲप डाउनलोड करा. यानंतर तुम्हाला ट्रेन शोधण्यासाठी आणि थेट तिकिटे बुक करण्यासाठी याचा वापर करता येईल.आयआरसीटीसीची वेबसाइट डाऊन झाल्याने, प्रवाशांना अधिकृत तिकीट एजंट किंवा ट्रॅव्हल एजन्सीकडून तिकीट बुक करता येते.रेल्वे प्रवाशांना पे टीएम, मेक माय ट्रीप, कन्फर्म टीकेटी, किंवा रेड बससारख्या ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवरही रेल्वे तिकीट बुक करता येईल.दरम्यान आज आयआरसीटीसीची वेबसाइट क्रॅश झाल्यानंतर प्रवाशांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून संताप व्यक्त केला आहे. या क्रॅशचा सर्वाधिक फटका तत्काळ तिकिटे बुक करणाऱ्यांना बसला आहे. कारण तत्काळ तिकिट प्रस्थानाच्या एक दिवस आधी बुक करता येते.

---

## विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शालेय शिक्षण विभाग प्रयत्नशील - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे



● पालघर, सुचिता सोनावणे :

राज्यातील प्रत्येक विद्यार्थांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हा दृष्टिकोन समोर ठेऊन शालेय शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार आहे. असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी सांगितले

डहाणू तालुक्यातील ऐने येथील ग्राममंगल संचलित मुक्त शाळा या विद्यालयास मंत्री श्री. भुसे यांनी भेट देऊन पाहणी केली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या सदस्या वैदेही वाढाण, ग्राममंगल संस्थेचे रमेश पानसे हेरंब कुलकर्णी, सचिन जोशी , श्याम सोनवणे तसेच अधिकारी शालेय शिक्षक, आणि विद्यार्थी उपस्थित होते.

शिक्षणाच्या विविध पद्धतीच्या माध्यमातुन आनंददायी शिक्षण विद्यार्थ्यांना आपण कशा प्रकारे देऊ शकतो तसेच शिक्षण विभागामध्ये प्रदीर्घ कार्य करणाऱ्या शिक्षण तज्ञ शिक्षण क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या विविध संस्था यांच्या सूचना विचारात घेऊन शैक्षणिक धोरण आखले जाणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

राज्यातील विविध शैक्षणिक संस्था मधील शिक्षकांशी तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून त्या अडचणी दूर करण्यासाठी शालेय शिक्षण विभाग प्रयत्नशील असणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

---

## नवीन वर्षापासून विद्यार्थ्यांसाठी वाचनविषयक आणखी एक उपक्रम

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :

राज्यातील विद्यार्थांसाठी वाचनविषयक उपक्रमांची आधीच गर्दी असताना आता शासनाने नववर्षापासून आणखी एका उपक्रमाला हात घालण्याचे ठरवले आहे. १ ते १५ जानेवारी या कालावधीमध्ये विद्यापीठे, महाविद्यालय व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबवण्याच्या सूचना उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांचे वाचनाचे प्रमाण कमी होत चालले आहे. 'नॅशनल अचिव्हमेंट सर्वे २०२१'च्या अहवालानुसार तिसरीच्या ३० टक्केपेक्षा जास्त मुलांना वाचताच येत नाही. पाचवीच्या ४१ टक्के मुलांना मजकूर योग्य पद्धतीने वाचता आला नाही. यामुळे वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन सरसावले असून विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात शासनाने राज्यातील सर्व शाळांमध्ये वाचन चळवळ वाढवण्याचा निर्णय घेतला होता. 'महाराष्ट्रातील वाचन चळवळ' हा उपक्रम राबवण्याच्या सूचना दिल्या होत्या. आठवीपर्यंतच्या मुलांना वाचनाची गोडी लावण्यासाठी व आनंददायी वाचनातून 'शिकण्यासाठी वाचू शकेल' अशी चळवळ युनिसेफ, प्रथम बुक्स, रिड इंडिया यांच्यासह शालेय शिक्षण विभागाकरवी राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. शिवाय, विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये काही उपक्रम राबवले जातातवाचनविषयक राज्य शासनाचे बरेच उपक्रम असले तरी त्यातील बहुतांशी कागदोपत्री राबवले जातात, असे शिक्षकांचे म्हणणे आहे. तर काहींच्या मते या उपक्रमांची व्यवस्थित अंमलबजावणी केली जाते. महाविद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा दिन, ग्रंथ प्रदर्शन, पुस्तक वाचून त्यावर समीक्षण असे उपक्रम राबवले जातात. यात बऱ्याच विद्यार्थ्यांचा समावेश असतो, असे कोल्हापूर जिल्हा प्राचार्य असोसिएशन अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी शनिवारी 'लोकसत्ता'शी बोलताना सांगितले. 'शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढावी यासाठी वाचन प्रेरणा दिन, पुस्तक समीक्षण, अवांतर पुस्तकांची उपलब्धता, वार्षिक नियतकालिकात लिहिण्यासाठी प्रोत्साहन असे उपक्रम नियमित राबवले जातात,' असे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे म्हणणे आहे.



### आधीचे उपक्रम कोणते?

■ दिवंगत राष्टपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम जयंतीदिनी 'वाचन प्रेरणा दिन' हा उपक्रम राबवला जातो. शिवाय, साप्ताहिक दोन वाचन तासिका, गोष्टींचा शनिवार, आनंदाचा तास याच्या जोडीने डिजिटल साधनांच्या वापरास प्रोत्साहन, 'रिड इंडिया सेलिब्रेशन' उपक्रम, ग्रंथोत्सव -पुस्तकाचे प्रदर्शन, शाळांमध्ये पुस्तकांची उपलब्धता असे उपक्रमही वर्षभर राबवले जात असतात.

### नवा उपक्रम कोणता?

■ उच्च व तंत्र शिक्षण विभागाने जानेवारीत पंधरवडाभर सर्व विद्यापीठे, महाविद्यालय व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत अभिनव उपक्रम राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये सामूहिक वाचन, वाचनकौशल्य, कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथा स्पर्धा आदी उपक्रमांचा समावेश आहे. याकरिता राज्यस्तरीय, विभागीयस्तरीय, जिल्हास्तरीय व महाविद्यालयीनस्तरीय समितीची रचना कशी असावी याचे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

---

## वृद्ध महिलेला डिजिटल अरेस्ट करुन सव्वा कोटींची सायबर फसवणूक

● मुंबई, यश सावंत :



गोरेगाव येथील ६८ वर्षीय महिलेला डिजिटल अटक करून त्याच्या बँक खात्यातून सव्वा कोटी रुपयांची सायबर फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. हैदराबादमध्ये घडलेल्या ५०० कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहारात सहभागी असल्याची भीती घालून सायबर फसवणूक करणाऱ्या भामट्यांनी या महिलेची फसवणूक केली. तक्रारदार महिला बँकेत कामाला होत्या.

त्यांनी २०१४ मध्ये स्वेच्छा निवृत्ती घेतली. त्या गोरेगाव पश्चिम येथे पतीसोबत राहतात. नोव्हेंबर महिन्यात त्यांना एका महिलेचा दूरध्वनी आला होता. आपण रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या सेवा क्रमांकावरून बोलत असल्याचे तिने सांगितले. क्रेडिट कार्डवरील रक्कम न भरल्यामुळे बँकेने त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे त्यांची सर्व बँक खाती गोठवण्यात येत असल्याचे या महिलेने तक्रारदारांना सांगितले. त्यामुळे तक्रारदार महिला घाबरली, तिने आपण असे कोणतेही क्रेडिटकार्ड वापरत नसल्याचे सांगितले. याप्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सायबर पोलीस यासंदर्भात अधिक तपास करीत आहेत.